सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील एम.बी.बी.एस., बी.डी.एस. व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये बदल करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१३/प्र.क्र.३४८/१३/शिक्षण-२
दिनांक:- ०९ मार्च, २०१५

वाचा:-१) समक्रमांकित शासन निर्णय दिनांक ०३.०१.२०१५.

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/एमएच-सीईटी-२०१५/अभ्यासक्रम/२०१५/१-अ, दिनांक १०.०२.२०१५.

<u>प्रस्तावना :-</u> सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील एम.बी.बी.एस., बी.डी.एस. व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षेचा (एमएच-सीईटी) पाठयक्रम व स्वरुप हे "नीट (युजी) २०१३" या परीक्षेप्रमाणे राहील. तथापि, "नीट (युजी) २०१३" या परीक्षेप्रमाणे निगेटिव्ह मार्कींगची पध्दत सदर परीक्षेकरीता लागू राहणार नाही असा निर्णय संदर्भ क्रमांक (१) च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. परंतू, सन २०१२ पूर्वी एमएच-सीईटी या सामाईक प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एच.एस.सी.) १२वी विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाप्रमाणे होता. त्यामुळे, सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून एमएच-सीईटी या सामाईक प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम हा पूर्वीप्रमाणेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एच. एस.सी.) १२वी विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाप्रमाणे असावा अशी विनंती अनेक विद्यार्थी व पालकवर्गानी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास केली होती. सबब, सदर परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एच.एस.सी.) १२वी विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाप्रमाणे करण्याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती संचालक (वै.शि.) यांनी संदर्भ क्रमांक (२) च्या पत्रान्वये शासनास केली होती. त्यानुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u> सन २०१५-१६ या शैक्षणिक दर्षापासून राज्यातील एम.बी.बी.एस., बी.डी.एस. व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षेचा (एमएच-सीईटी) अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एच. एस.सी.) १२वी विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि.अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई